समृद्धी महामार्ग अपघात : आठ मृतांच्या कुटुंबीयांना ४० लाखांची मदत >> पान 2

नाशिकच्या नामांकित कंपनीमध्ये महिलांवर लैंगिक अत्याचार >> पान 3

माणुसकीचा अंत! ज्यांच्या हाती भविष्य घडवायची जबाबदारी, त्याच नराधम शिक्षकाने ओरबाडले चिमुरड्यांचे बालपण >> पान 4

सुविचार

सुविचार आयुष्यात सगळे निर्णय आपले नसतात, काही निर्णय वेळ आणि परिस्थितीचे असतात.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com  मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 240 ■ गुरूवार, दि. 09 एप्रिल 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



व्यक्तिमत्त्व अधिकारांच्या रक्षणाची मागणी करत अभिनेता कार्तिक आर्यनची हायकोर्टात धाव

आतील पान

### जीआय टॅग मिळूनही अडचण; पांढऱ्या कांद्याच्या उत्पादनात मोठी घट

**रायगड :** बदलत्या हवामानाचा मोठा फटका यंदा अलिबाग तालुक्यातील पांढरा कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. यावर्षी कांद्याच्या उत्पादनात सुमारे २५ टक्क्यांनी घट झाल्याची माहिती समोर आली असून, बाजारात तुटवडा निर्माण झाला आहे. परिणामी, कांदा उत्पादक शेतकरी गंभीर आर्थिक अडचणीत सापडल्याचे चित्र दिसत आहे.

### भारतीय रिझर्व्ह बँकेने रेपो रेट स्थिर ठेवला

**मुंबई :** भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) २०२६-२७ आर्थिक वर्षासाठी पहिल्या मौद्रिक धोरण समितीच्या (एम पीसी) बैठकीचे निकाल आज, ८ एप्रिलला जाहीर केले. आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी जाहीर केलेल्या निकालानुसार, रेपो रेट ५.२५ टक्क्यांवर स्थिर ठेवण्यात आला आहे आणि यामध्ये कोणतीही बदल करण्यात आलेली नाहीत.

### जागतिक बाजारांकडून सकारात्मक संकेत

**मुंबई :** पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या युद्धात दोन आठवड्यांच्या युद्धविराम ाच्या घोषणेनंतर आज जागतिक बाजारांमध्ये तेजीची चिन्हे दिसत आहेत. मागील सत्रात अमेरिकन बाजार संमिश्र निकालांसह सपाट बंद झाले असले तरी, आज डाऊ जोन्स फ्युचर्सम ध्ये जोरदार तेजी दिसून येत आहे. युरोपियन बाजार मागील सत्रात कमजोर बंद झाले, तर आशियाई बाजारांमध्ये आज मोठ्या प्रमाणात खरेदी दिसून येत आहे.

### मित्राने वाढदिवसाला बोलावलं नाही, युवकाने संपवलं जीवन

**बीड :** जिल्ह्याच्या अंबाजोगाई तालुक्यातील कुंबेफळ येथे एका २४ वर्षीय तरुणाने मित्रांसोबत झालेल्या वादानंतर आणि वाढदिवसाच्या सेलिब्रेशनला न बोलावल्यामुळे आलेल्या नैराश्यातून विष प्राशन करून आपली जीवनयात्रा संपविल्याची धक्कादायक घटना घडली आहे. महेश उद्धव भणगे असे या आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव असून, राहत्या घरी विष प्राशन करुन हे टोकाचे पाऊल उचलले. आपल्या जवळच्या मित्राच्या वाढदिवसाला डावलण्यात आल्याने तो गेल्या काही दिवसांपासून प्रचंड नैराश्यात होता. त्यातूनच, त्याने हे कृत्य केल्याची प्राथमिक माहिती आहे.

विकासाचा फायदा मागासवर्गीयांपर्यंतही पोहोचला पाहिजे




# युद्धविरामानंतरही इराणमधील तेल शुद्धीकरण प्रकल्पावर हल्ला

**तेहरान :** अमेरिका आणि इराण यांच्यात (दि.८) जाहीर झालेला दोन आठवड्यांचा युद्धविराम लागू झाल्यानंतर काही तासांतच इराणच्या लावन बेटावरील एका तेल शुद्धीकरण प्रकल्पावर बुधवारी 'शत्रूराष्ट्राकडून' हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. इराणच्या पेट्रोलियम मंत्रालयाचे मुखपत्र असलेल्या 'शाना' वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, नॅशनल इराणीयन ऑईल रिफायनिंग अँड डिस्ट्रिब्युशन कंपनीने या हल्ल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.



**सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही**

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, हा हल्ला स्थानिक वेळेनुसार सकाळी १० वाजण्याच्या सुमारास झाला. सुदैवाने, या हल्ल्यात कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि परिसराची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी तातडीने सुरक्षा आणि अग्निशमन दलांना पाचारण करण्यात आले होते.

**युद्धविरामाचा करार वादाच्या भोवऱ्यात**



### आमचा पूर्ण विजय : डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा

*एएफपी शी बोलताना अध्यक्ष ट्रम्प यांनी हा करार अमेरिकेचा पूर्ण विजय असल्याचे म्हटले आहे. या करारानुसार, अमेरिका दोन आठवडे इराणवरील हल्ले स्थगित ठेवणार असून, त्या बदल्यात तेहरानने जागतिक तेल पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला 'हॉर्मूझची सामुद्रधुनी' तात्पुरती खुली करण्यास संमती दिली होती; परंतु, ताज्या हल्ल्यामुळे या क्षेत्रातील तणाव पुन्हा एकदा वाढला आहे.*

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलेल्या 'पूर्णतः नष्ट' करण्याच्या धमकीनंतर, ऐन-वेळी युद्ध टाळण्यासाठी दोन्ही देशांमध्ये हा तहाचा करार झाला होता. ट्रम्प यांनी 'इराणी संस्कृती' नष्ट करण्याची धमकी दिल्यानंतर, ती रोखण्यासाठी अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यात दोन आठवड्यांच्या युद्धविरामावर सहमती झाली होती. मात्र, बुधवारी केवळ इराणमध्येच नव्हे, तर आखाती देशांमध्येही हल्ले सुरूच राहिल्याने हा करार वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे.

# अवैध मुरुम उत्खनन दोषी अधिकाऱ्यांची बडतर्फी




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** चिंचोली एमआयडीसीमध्ये झालेल्या बेकायदा मुरूम उत्खनन आणि वाहतूक प्रकरणी महसूलमंत्र्यांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला आहे. या घोटाळ्यात सहभागी असलेल्या आणि कर्तव्यात कसुरी करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर थेट बडतर्फीची कारवाई करण्याचे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. तसेच, संबंधित कंपन्यांकडून २०० कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यासाठी त्यांच्या मालमत्तेवर बोजा चढविण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

आमदार राजू खरे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे चिंचोली एमआयडीसीतील अवैध उत्खननाचा मुद्दा उपस्थित केला होता. याबाबत महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महसूलमंत्र्यांनी हे आदेश दिले. बैठकीला सोलापूरचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन तसेच मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**२० लाख ब्रासचा अवैध उपसा आणि ५०० कोटींच्या महसुलाचे नुकसान**

बैठकीत आमदार राजू खरे म्हणाले की, ''चिंचोली एमआयडीसीमध्ये



तब्बल २० लाख ब्रास मुरुमाचा अवैध उपसा झाला आहे. मोठ्या प्रमाणात खड्डे खोदून मुरुम काढल्यामुळे नवीन उद्योगांना जागा मिळणे कठीण झाले आहे. यामुळे नियोजित १०० उद्योग येऊ शकले नाहीत आणि शासनाचा ५०० कोटी रुपयांचा अपेक्षित महसूल बुडाला आहे. विनापरवाना उत्खनन करणाऱ्या कंपन्यांवर गुन्हे दाखल करणे आवश्यक आहे.''

या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे, एका प्रकरणात ४३ कोटी रुपयांचा दंड निश्चित करण्यात आला असताना तो केवळ १० लाख रुपयांपर्यंत खाली आणला गेला. या संशयास्पद बाबीची सखोल चौकशी करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत. तसेच, या कालावधीत जे अधिकारी कार्यरत होते, त्यांची यादी सादर करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.

## आपला विदर्भ लाईव्ह'च्या बातमीचा मोठा इम्पॅक्ट

# आ. सिद्धार्थ खरातांचा जलजीवन मिशनवर धडक दौरा!



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर :** दैनिक आपला विदर्भ लाईव्हच्या माध्यमातून उघडकीस आलेल्या जलजीवन मिशनमधील गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेत आमदार सिद्धार्थ खरात यांनी आज नागापूर येथे थेट पाहणी करत प्रशासनाला धारेवर धरले.

माहितीनुसार, ३१ मार्च रोजी झालेल्या वार्षिक सभेत संबंधित अधिकाऱ्यांनी तालुक्यातील अनेक जलजीवन मिशन योजना पूर्ण झाल्याचा दावा केला होता. मात्र आपला विदर्भ लाईव्हच्या पाहणीत नागापूर गावांमध्ये प्रत्यक्षात पाणीपुरवठा सुरू नसल्याचे वास्तव समोर आले. गावांमध्ये पाण्याचा थेंबही नसताना पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी काम पूर्ण. दाखवल्याचा प्रकार उघड झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप पसरला.

या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी आमदार सिद्धार्थ खरात यांची भेट घेऊन लेखी तक्रार सादर केली.

## कागदोपत्री योजना, गावात पाणी नाही!

## घटना उघडकीस आल्यानंतर

# आमदार थेट ॲक्शन मोडवर



प्रकरणाची गंभीरता लक्षात घेत आमदारांनी तात्काळ नागापूर येथे भेट देत जलजीवन मिशनच्या कामाची पाहणी केली. पाहणीदरम्यान योजना पूर्णतः अपयशी ठरल्याचे स्पष्ट झाले.

संतप्त नागरिकांनी आमदारांसमोर आपली व्यथा मांडत जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली.

यावेळी आमदारांनी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता धाबे यांना तातडीने घटनास्थळी बोलून सदर गंभीर प्रकार समोर आणला तसेच संबंधित विद्युत विभागालाही बोलावून संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेतला. ''जनतेची व लोकप्रतिनिधींची दिशाभूल करणाऱ्यांना सोडणार नाही,'' असा इशारा देत त्यांनी तात्पुरत्या पाणीपुरवठ्याची व्यवस्था तातडीने करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, आमदारांच्या या तात्काळ कारवाईमुळे ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, दोषींवर कठोर कारवाई होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.





**आमदार सिद्धार्थ खरात यांचा इशारा सदर प्रकरणे अत्यंत गंभीर असून आतापर्यंत संयमाने हाताळले, मात्र आता कुठलीही मुभा दिली जाणार नाही. संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा ठाम इशारा आमदार सिद्धार्थ खरात यांनी आपला विदर्भ लाईव्हशी बोलताना दिला.**

## पश्चिम बंगालकडे लक्ष...

चार राज्ये आणि एक केंद्रशासित प्रदेश यांच्यातील विधानसभा निवडणूक आता अक्षरशः तोंडावर आली आहे. तथापि, या सर्व निवडणुकांमध्ये पश्चिम बंगाल या राज्यातील निवडणूक विशेषत्वाने गाजत आहे. सखोल मतदारसूची पुनर्सर्वेक्षण किंवा एसआयआर हा विषय या राज्यात तृणमूल काँग्रेस आणि त्या पक्षाच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी अत्याधिक वादग्रस्त बनविला. त्यामुळे ही निवडणूक चर्चेचा आणि आकर्षणाचा विषय बनली. या राज्यातील एसआयआर प्रक्रिया ममता बॅनर्जी यांच्या जिव्हारी लागल्याचे दिसत आहे. त्यामुळे त्यांनी या राज्यात एसआयआर होऊ नये, म्हणून आकाश- पाताळ एक करण्याचा प्रयत्न केला. प्रारंभी तर त्यांनी एसआयआर कसे केले जाते तेच पाहते, अशी अतिरेकी भूमिका घेऊन पाहिली. तथापि, प्रथम केंद्रीय निवडणूक आयोग आणि नंतर सर्वोच्च न्यायालय यांनी त्यांच्या धमकीला भीक घातली नाही. त्यामुळे बॅनर्जी यांनी स्वतः व्यक्तीशः सर्वोच्च न्यायालयात उभे राहून या प्रक्रियेविरोधात युक्तीवाद केला. असा प्रकार आतापर्यंत कोणत्याही विद्द्यमान नेत्याने केलेला नाही. त्या न्यायालयावर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहेत, असा आरोप त्यामुळे करण्यात आला. पण बॅनर्जी यांचा हा प्रयत्नही फसला. नंतर, सर्वोच्च न्यायालयाने एसआयआरची ही प्रक्रिया कलकत्ता उच्च न्यायालयावर सोपविली. त्याआधी केंद्रीय निवडणूक आयोगाने प्रथम ५८ लाख आणि नंतर ५ लाख अशा ६३ लाख अवैध मतदारांची नावे सूचीतून वगळली होती. तसेच ६० लाख नावांना संशयास्पद मानले. या ६० लाख संशयास्पद मतदारांची प्रकरणे या ८०० न्यायाधीशांकडे देण्यात आली. आता या ६० लाखमधील २७ लाख नावे गेली. अशा प्रकारे, सध्या एकंदर ९० लाख नावे वगळण्यात आली आहेत. येथे मोठ्या प्रमाणात बोगस मतदान केले जाते आणि ते बव्हंशी राज्यात सत्ताधारी असणाऱ्या पक्षाला केले जाते, असा आरोप होत आहे. तो खरा की खोटा हा प्रश्न असला, तरीपण बॅनर्जी यांनी एसआयआर विरोधात ज्या प्रकारे थयथयाट केला, तो पाहता कोठेतरी पाणी मुरते आहे, हा संशय बळावतो. आता पुष्कळशी बोगस किंवा अवैध नावे सूचीतून गेली आहेत. त्यामुळे बॅनर्जी अस्वस्थ आहेत, असाही आरोप होत आहे. वास्तविक, सर्वच राज्यांमध्ये एसआयआर होत आहे. तामिळनाडूतही ९० लाख नावे वगळण्यात आली आहेत. पण तेथे किंवा कोठेही एसआयआर विरोधात खळखळ झालेली नाही. मग ममता बॅनर्जी याच इतक्या टोकाची भूमिका का घेत आहेत, हा प्रश्न आहे. त्यामुळे संशयाला आणखी जागा प्राप्त होते. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचा विजय झाला असतानाही पश्चिम बंगालमध्ये विजयी पक्षाकडून प्रचंड हिंसाचार घडविण्यात आला. ज्यांनी भारतीय जनता पक्षाला मतदान केले, असा संशय होता, त्यांच्यापैकी अनेकांना वेचून मारहाण करण्यात आली. काही जणांच्या हत्या झाल्या. घरे जाळण्यात आली. महिलांवर अत्याचार करण्यात आले. राज्याच्या पोलीसांनी बघ्याची भूमिका घेतली. म्हणून या प्रकरणांची चौकशी सीबीआयकडे उच्च न्यायालयाच्या सूचनेवरुन देण्यात आली. पश्चिम बंगालला निवडणूक हिंसाचाराची मोठी परंपरा आहे. पण गेल्या काही वर्षांमध्ये या प्रवृत्तीने सर्व मर्यादा पार केल्या आहेत, हे दिसून येताच, केंद्रीय निवडणूक आयोगाने यावेळी सुरक्षा अधिक कठोर केली. उच्च पातळीपासून पोलीस स्थानकांच्या पातळीपर्यंत अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या गेल्या. केंद्रीय सुरक्षा दलांचे लक्षावधी सैनिक नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांना मतदान केंद्रांच्या आतही नियुक्त केले जाणार आहे. सर्व मतदान केंद्रांमध्ये आत आणि बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून त्यांचे व्यवस्थापन केंद्रीय सुरक्षा दलांकडे देण्यात आले आहे. मोठ्या कॉलनीजमध्ये राहणाऱ्या भद्रलोकांना मतदानासाठी बाहेरच पडता येऊ नये, यासाठी कॉलन्यांच्या प्रवेशद्वारांना मतदानाच्या दिवशी कुलुपे घालण्याचा प्रकार सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मागच्या निवडणुकीत केला. यावेळी यासाठी मोठ्या कॉलन्यांमध्येच मतदान केंद्रे स्थापन केली जाणार आहेत. अशा प्रकारे मतदारांनी भय न बाळगता मुक्तपणे मतदान करावे, अशी शक्य तितकी व्यवस्था करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी मालदा येथे एसआयआरच्या कामासाठी गेलेल्या सात न्यायाधीशांनाच हजारोंच्या जमावाने १०-१२ तास कोंडून घातले होते. असा प्रकार देशात यापूर्वी कधीच घडलेला नाही. सर्वोच्च न्यायालयाने त्याची नोंद घेऊन राज्य सरकारची चांगलीच कानउघाडणी केली. अशा प्रकारे एसआयआर, कडेकोट सुरक्षा आणि मालदा प्रकरण अतिशय भिन्न वातावरणात येथे निवडणूक होत आहे. ती चर्चेचा विषय होणे स्वाभाविक आहे.

# समृद्धी महामार्ग अपघात : आठ मृतांच्या कुटुंबीयांना ४० लाखांची मदत

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ५ लाख रूपये

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर दि. १ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या अपघातात आठ महिलांचा मृत्यू झाला. सदर घटनेच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या मदतीनुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी रुपये ५ लाख प्रमाणे एकूण रुपये ४० लाख इतकी आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. ही रक्कम जिल्हाधिकारी, जालना यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. अपघात जालना शहरालगतच्या कडवंची गावाजवळ सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास घडला. मजुरांना घेऊन जाणाऱ्या पिकअप वाहनास मागून येणाऱ्या ट्रकने धडक दिल्याने ही दुर्घटना घडली.

अपघातात आठ महिलांचा जागीच मृत्यू झाला असून पाच व्यक्ती जखमी झाल्या आहेत. जखमींवर जालन्यातील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृतांमध्ये लक्ष्मीबाई संतोष मदन, कडुबाई रामदास मदन, ताराबाई गहेनाजी चौधरी, मंगलाबाई प्रकाश सिनगारे, सुमनबाई कचरू अदमाने, अलकाबाई दादाराव अदमाने, मिनाबाई परमेश्वर अदमाने व कांचनबाई प्रकाश अदमाने यांचा समावेश आहे. घटनेची माहिती प्राप्त होताच समृद्धी महामार्ग नियंत्रण कक्षामार्फत तात्काळ आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी पाठविण्यात आल्या. रुग्णवाहिका व पोलीस यांच्या समन्वयातून जखमींना त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक तपासात संबंधित ट्रक चालक मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत असल्याचे निदर्शनास आले असून त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.



या प्रकरणी मृतांच्या वारसांची पडताळणी करून मंजूर मदत तातडीने वितरित करण्याबाबत जिल्हा प्रशासनास निर्देश देण्यात आले आहेत.

समृद्धी महामार्गावर घडलेली ही घटना अत्यंत दुर्दैवी व वेदनादायक असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची तात्काळ दखल घेऊन मृतांच्या कुटुंबीयांना मदत देण्याचे निर्देश दिले आणि त्यानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. शिवाय, जखमींना आवश्यक ती वैद्यकीय मदत तातडीने मिळावी, यासाठीही प्रशासनाला मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना दिल्या आहेत. गरजू नागरिकांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधी बाबत अधिक माहितीसाठी व मदतीसाठी टोल फ्री क्रमांक १८०० १२३ २२११ वर संपर्क साधावा असे श्री.रामेश्वर नाईक कक्ष प्रमुख मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष यांनी कळविले आहे.

# भोगवटा प्रमाणपत्राच्या प्रस्तावामुळे थेट विकासकाचा फायदा होणार, किशोरी पेडणेकर यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये आलेल्या भोगवटा प्रमाणपत्राच्या (ध्ण) प्रस्तावामुळे थेट विकासकाचा फायदा होणार आहे, असा आरोप मुंबई महानगरपालिकेच्या विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी बुधवारी (८ एप्रिल) केला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, ''स्थायी समितीमध्ये बोलण्यासाठी आमच्या सदस्यांनी तयारी केली होती. आम्ही पाण्याची जी अभय योजना आणली होती, ती सर्वसामान्य जनतेचा फायदा करण्यासाठी आणली होती. पण या भोगवटा प्रमाणपत्राच्या प्रस्तावामुळे सरळ विकासकाचा फायदा होणार आहे. भोगवटा प्रमाणपत्र आणणे हा विकासकाचे काम आहे. मात्र, आता या प्रस्तावामुळे थेट सर्वसामान्य मुंबईकरांचा नाही तर बिल्डर लॉबीचा त्याच्यातून फायदा होणार आहे.''

लवकरच या प्रस्तावावर निर्णय घेऊ : मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये भोगवटा प्रमाणपत्र संदर्भात प्रस्ताव आला होता. मात्र, स्थायी समिती अध्यक्षांनी या प्रस्तावावर कोणतीही चर्चा न करता प्रशासनाकडे परत पाठवला. यानंतर पत्रकार परिषद घेत विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी या प्रस्तावावर घणाघात केला. तर या प्रस्ताव विषयी बोलताना भाजपाचे गटनेते गणेश खणकर म्हणाले की, ''आज जो प्रस्ताव स्थायी समितीपुढं आला. त्यामध्ये कित्येक त्रुटी होत्या. त्यामुळं हा प्रस्ताव आम्ही प्रशासनाकडे पुन्हा पाठवला आहे. भोगवटा प्रमाणपत्र नसल्यामुळे अनेक मुंबईकरांना त्रासाला सामोरे जावं लागत आहे. मात्र, आम्ही मुंबईकरांसोबत असून लवकरच यावर निर्णय घेऊ. प्रस्तावामध्ये केवळ ८०० फुटांच्या घरांचा उल्लेख होता. मात्र आमच्या मते ८०० फुटांहून अधिकची जी घरं आहेत. त्यांच्याकडेही प्रशासनानं लक्ष देणं गरजेचं आहे.''



करदात्यांना त्रास होऊ नये, ही आमची भूमिका : याचबरोबर, ''आमची भूमिका याविषयी अतिशय स्पष्ट आहे, मुंबई महानगरपालिकेमध्ये ज्या काही झोपडपट्ट्या होत्या. त्यांना एसआरए करून त्यांची आपण मदत करतो. मात्र, ज्या करदात्यांनी इतकी वर्षे मुंबईकरांना कर दिला आहे. त्यांच्या देखील आपण पाठीशी उभा राहिलं पाहिजे. करदात्यांचा हा गुन्हा नाही आहे. यामुळेच आम्ही करदत्यांच्यासोबत असून करदात्यांना न्याय मिळावा, अशी आमची भूमिका आहे. बिल्डरच्या चुकांमुळं करदात्यांना त्रास होऊ नये, ही आमची भूमिका आहे. म्हणूनच या प्रस्तावामध्ये सुधारणा करून हा प्रस्ताव आम्ही पुन्हा आणणार आहोत,'' असंही भाजपाचे गटनेते गणेश खणकर यांनी सांगितलं. तर दुसरीकडे, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे गटनेते अमेय घोले म्हणाले की, ''प्रस्तावामध्ये काही त्रुटी होत्या म्हणून तो प्रस्ताव प्रशासनाला पुन्हा पाठवला आहे. या संदर्भात ज्या कोणत्या त्रुटी प्रस्तावात होत्या, त्या दुरुस्त करून पुन्हा एकदा तो मागवण्यात आला आहे.''

# मस्साजोगच्या सरपंच पदासाठी संतोष देशमुखांच्या पत्नी उद्या अर्ज भरणार; निवडणूक होणार की बिनविरोध?

दैनिक आपला विदर्भ

**बीड । प्रतिनिधी :** जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला १ वर्षाचा कालावधी उलटला असून या प्रकरणातील आरोपी तुरुंगात आहेत. दुसरीकडे आता, येथील ग्रामपंचायतीत सरपंच पदासाठी निवडणूक (एतमूदह) कार्यक्रम जाहीर झाला असून मस्साजोगचा नवा सरपंच कोण याची उत्सुकता सर्वांनाच आहे. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हेच गावचा कारभार हाती घेतील का, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु होती. मात्र, आता मस्साजोगच्या सरपंच पदासाठी दिवंगत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

मस्साजोग सरपंच पोटनिवडणुकीत सरपंच पदासाठी दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी उद्या आपला उमदेवारी अर्ज दाखल करणार आहेत. देशमुख कुटुंबीयांनी एकमताने आणि ग्रामस्थांशी विचार विनिमय, चर्चा करुन अश्विनी देशमुख यांचे नाव निश्चित केलं आहे. त्यानुसार, उद्या सकाळी ११.०० वाजता सरपंच पदासाठी त्या आपला उमेदवारी अर्ज साध्या पद्धतीने दाखल करणार आहेत. दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मस्साजोगचे सरपंच पद रिक्त झाले होते. आता, नव्याने गावचा कारभार हाती घेणाऱ्या नवीन सरपंचांचा कालावधी १८ महिने इतका असणार आहे.मस्साजोग सरपंच पोटनिवडणुकीच्या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली असून संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांचा अर्ज भरुन त्यांना बिनविरोध सरपंच पद द्यावे अशी गावकऱ्यांची अपेक्षा आहे. संतोष देशमुख यांच्या पत्नीला सरपंच पद देणे हीच खरी संतोष देशमुख यांना श्रद्धांजली असणार आहे, अशी गावतील महिला वर्गाचीही मागणी आहे. तर, त्यांना सरपंचपदाचा अनुभव असल्याचेही सांगितले जाते.

# मानखुर्दमधील बॉम्बे सोप फॅक्टरीच्या जागेवरील १४०० अनधिकृत झोपड्या पाडल्या, मुंबई पालिकेची कारवाई

**मुंबई । प्रतिनिधी :** मानखुर्द येथील बॉम्बे सोप फॅक्टरीच्या जागेवरील १४०० अनधिकृत झोपड्यांचे पाडण्यात आल्या आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबई उपनगरे जिल्हाधिकारी कार्यालय यांनी संयुक्त कारवाई केली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ५० अन्वये घाटकोपर-मानखुर्द जोड मार्गालगत असलेल्या मानखुर्द येथील बॉम्बे सोप फॅक्टरी (डब्बा कंपनी) या शासकीय जागेवरील झोपड्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यासंदर्भात अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण निष्कासन) पूर्व उपनगरे यांनी निर्देशित केले होते.

घाटकोपर-मानखुर्द जोड मार्गालगत असलेल्या मानखुर्द येथील बॉम्बे सोप फॅक्टरी (डब्बा कंपनी) या शासकीय जागेवरील १४०० अनधिकृत झोपड्यांचे आज निष्कासन करण्यात आले. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे 'एम पूर्व' प्रशासकीय विभाग आणि मुंबई उपनगरे जिल्हाधिकारी कार्यालय यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. हानगरपालिकेचे सह आयुक्त (परिमंडळ-५) श्री. देविदास क्षीरसागर, सहायक आयुक्त (एम पूर्व) उज्ज्वल इंगोले यांच्या नेतृत्वात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'एम पूर्व' प्रशासकीय विभागाने ही कारवाई केली. इमारत व कारखाना विभागातील सहायक कनिष्ठ आणि दुय्यम अभियंत्यांची या कारवाईसाठी नेमणूक करण्यात आली होती.

# बुलढाणा जिल्हा: महसूल प्रशासन आणि डिजिटल क्रांतीचा नवा अध्याय

बुलढाणा जिल्ह्याने सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात महसूल प्रशासन, ई-गव्हर्नन्स आणि लोककल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत एक सुवर्ण अध्याय लिहिला आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या कल्पक नेतृत्वाखाली जिल्ह्याने केवळ निर्धारित महसुली उद्दिष्टेच पार केली नाहीत, तर प्रशासनाचा आरसा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डिजिटल डॅशबोर्डच्या माध्यमातून पारदर्शकतेचा नवा वस्तुपाठ घालून दिला आहे. जिल्ह्याने एकूण १३,६४९.४७ लाख रुपयांच्या महसूल वसुलीच्या लक्षासमोर १६,१०१.७५ लाख रुपयांची वसुली करून ११७.९७% यश संपादन केले आहे. यामध्ये संग्रामपूर तालुक्याने १५२.४९% वसुलीसह जिल्ह्यात ऐतिहासिक आघाडी घेतली असून, जळगाव जामोद आणि खामगाव या तालुक्यांनीही उल्लेखनीय योगदान दिले आहे. विशेष म्हणजे जमीन महसूल आणि गौण खनिज या दोन्ही प्रमुख लेखाशीर्षांत जिल्ह्याने ११७.९७% पेक्षा जास्त वसुलीची नोंद केली असून, गौण खनिज विभागात ११९% हून अधिक वसुली झाली आहे.

डिजिटल प्रशासनाच्या क्षेत्रात ई चावडी प्रणाली महसूल वसुलीमध्ये बुलढाणा जिल्ह्याने राज्यात दुसऱ्या क्रमांकाची झेप घेतली आहे. ई-महसूल प्रणालीच्या प्रभावी वापरामुळे १७,२५० अर्जांपैकी केवळ ०.४% अर्ज प्रलंबित असून, प्रशासकीय गतीमानता सिद्ध झाली आहे. जिल्ह्यातील फेरफार प्रकरणांचा निपटारा सरासरी १३ ते १८ दिवसांत केला जात असून, ९४% पेक्षा अधिक प्रकरणांचा यशस्वी निकाल लावण्यात आला आहे. नागरिकांना तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी महसूल मित्र हा एआय आधारित चॅटबॉट कार्यान्वित करण्यात आला आहे, ज्याद्वारे ७/१२ उतारा, ई-मोजणी आणि इतर महसुली सेवांची माहिती नागरिकांना त्यांच्या मोबाईलवर सहज उपलब्ध होत आहे. सहज प्रणाली अंतर्गत सन १८५० पासूनचे २ कोटींहून अधिक ऐतिहासिक दस्तऐवज १६ टीबी क्लाउड स्टोरेजवर जतन करण्यात आले असून, मोडी लिपीतील कागदपत्रांचे जेमिनी एआय द्वारे मराठीत भाषांतर करण्याची आधुनिक सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

बुलढाणा जिल्ह्यात जिवंत सातबारा मोहिमेद्वारे १२,११४ मयत खातेदारांचा शोध घेऊन ९८.९८% वारस नोंदी पूर्ण करण्यात आल्या, तर टप्पा २.० अंतर्गत १२,८८५ प्रकरणांत अभिलेख दुरुस्ती करून सातबारा उतारा अद्ययावत करण्यात आला आहे. सार्वजनिक हक्कांच्या रक्षणासाठी १,२८४ निस्तार पत्रके अद्ययावत करण्यात आली आणि ७२५ गावांत रूढी-परंपरांचे जतन करणारे वाजिब उल अर्ज नव्याने तयार करण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील शेतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पाणंद रस्ते मोहिमेत ७२५ बंद पडलेले रस्ते अतिक्रमणमुक्त करून खुले करण्यात आले, ज्यामुळे शेतकऱ्यांचा ३० वर्षांपासूनचा वनवास संपला आहे. तसेच, प्रत्येक गावाला स्मशानभूमीसाठी अधिकृत शासकीय जागा उपलब्ध करून देण्याच्या निर्णयानुसार १,४८६ गावांच्या महसुली अभिलेखात कायमस्वरूपी कायदेशीर नोंदी करण्यात आल्या आहेत.

शेतकरी कल्याणासाठी जिल्हा प्रशासन अत्यंत संवेदनशील राहिले असून, नैसर्गिक आपत्तीच्या काळात ६,४५,६११ शेतकऱ्यांना ४३,१९३.७७ लाख रुपयांची मदत थेट बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. प्रशासनाच्या या सर्वांगीण प्रयत्नांमुळे शेतकरी आत्महत्यांच्या प्रमाणात २०१७ मधील १५६ च्या तुलनेत २०२५ मध्ये ७७ पर्यंत मोठी घट झाली आहे. पायाभूत विकासासाठी जिगाव आणि इतर प्रकल्पांकरिता १९८४.५१ हेक्टर जमिनीचे संपादन करण्यात आले असून, प्रकल्पग्रस्तांना १,५५४.५८ कोटी रुपयांचा मोबदला वितरित करण्यात आला आहे. ग्रामीण रोजगाराच्या बाबतीतही जिल्ह्याने २०२५-२६ मध्ये ३३.७ लाख मनुष्यदिनांची निर्मिती करून नवा उच्चांक गाठला आहे, ज्यामुळे हजारो कुटुंबांचे स्थलांतर थांबण्यास मदत झाली आहे.

प्रशासकीय सक्षमीकरणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकार करत तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांना ५९३ लॅपटॉप व ६२४ प्रिंटर पुरवण्यात आले आहेत. भूमी अभिलेख कार्यालयांना मोजणीत अचूकता आणण्यासाठी ९१ अत्याधुनिक रोव्हर मशिन्स उपलब्ध करून देण्यात आली आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातील फाईल्सचा निपटारा ९६% ते ९९% असून निर्णय प्रक्रिया जास्तीत जास्त ४ स्तरांपर्यंत मर्यादित ठेवून पारदर्शकता जपली आहे. तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत विकासाची फळे पोहोचवणे, हेच आमच्या लोकाभिमुख प्रशासनाचे सर्वोच्च ध्येय असून, बुलढाणा पॅटर्न हा राज्यासाठी एक अनुकरणीय आदर्श ठरला आहे.

------------------

**यासिरुद्दीन काझी**
**(जिल्हा माहिती अधिकारी, बुलढाणा)**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### समरजीत घाडगे यांच्या भाजप प्रवेशातून महायुतीतील घटक पक्षांना इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** समरजीत घाडगे भाजपचेच होते, विधानसभा निवडणुकीत आमच्या पक्षाची उमेदवारी त्यांना हवी होती, त्यामुळे ते आमच्याकडे आले होते. निवडणूक लढवून ते पुन्हा भाजपवासी झाले आहेत. त्यांना प्रवेश देऊन भाजपने महायुतीतील मित्र पक्षांना एक प्रकारे इशाराच दिला आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केले.

घाडगे भाजपचेच होते, ते भाजपमध्येच गेले. त्यामुळे त्यांनी वेगळे काही केले नाही. भाजपने हा विद्यमान लोकप्रतिनिधी हसन मुश्रीफा यांना दिलेला इशारा आहे. भाजप २०२९ ची विधानसभा निवडणूक स्व:बळावर लढविणार आहे. भाजप नेते अमित शहा यांनी तसे जाहीर केले आहे. त्यामुळे भाजप महायुतीतील मित्रपक्षांचा लोकप्रतिनिधी असलेल्या ठिकाणीच्या कार्यकर्त्यांनाही पक्षात प्रवेश देत आहे.

भविष्यकाळात सर्व निवडणुका स्व:बळावर लढविण्याचीच ही तयारी आहे, असेही शिंदे म्हणाले. सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवड प्रक्रियेदरम्यान झालेली घटना महाराष्ट्राची मान खाली घालायला लावणारी आहे. या घटनेविरोधात आमची मोर्चा काढण्याची तयारी आहे, पण, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि शिवसेना (शिंदे) या पक्षांची भूमिका अद्याप समजू शकली नाही, असेही शिंदे म्हणाले.

### परभणीत दोन लाचखोरांना एकाच दिवशी अटक; वैद्यकीय अधिकाऱ्यास ४० हजार घेताना रंगेहात अटक

दैनिक आपला विदर्भ

**परभणी । प्रतिनिधी :** राज्यात गेल्या काही महिन्यात एसीबीने प्रशासकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडवून दिली असून लाचखोर अधिकारी, कर्मचाऱ्यांना फास आवळला आहे. त्यामुळे, गेल्या काही महिन्यात चक्क शिपायांपासून ते तहसीलदारपर्यंतच्या अधिकाऱ्यांस बेड्या ठोकल्या आहेत. जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांमध्ये लाचखोरीच्या प्रमाणात वाढ झाल्याचे आता सिद्धच झालं आहे. कारण, आज एकाच दिवशी दोन लाचखोर अधिकारी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यामध्ये अडकले आहेत. त्यामुळे, जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली असून आता तरी सरकारी कार्यालयात पैस दिल्याशिवाय काम होईल की नाही, असा सवाल सर्वसामान्यांकडून उपस्थित केला जात आहे.

परभणीच्या पालम येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक अधीक्षक डॉ. रमेश खंदारे यांचा रुग्णालयातील कापड स्वच्छता कंत्राटदार यांच्याबरोबर व्यवहार होता, त्याच अनुषंगाने त्यांनी त्याला ५० हजारांची लाच मागितली. त्यानुसार, कंत्राट दाराकडून ४० हजार रुपयांची लाच स्वीकारताना त्यांना एसीबीच्या एका टीमने अटक केली. मात्र, लाच लुचपत विभागाच्या टीमने पकडल्यानंतर हे पैसे माझे नाहीत, म्हणून खंदारे यांनी ते पैसे फेकून देण्याचा प्रयत्न केला. मात्र, एसीबीने त्यांना ताब्यात घेत पुढील तपास सुरू केला आहे. दुसरीकडे परभणीच्या पाथरी तालुक्यातील भूमी अभिलेख मधील वरिष्ठ लिपिक बिडकर यांनी चुकीची मोजणी करून नकाशा बनवला होता, तीच मोजणी पुन्हा करुन अचूक नकाशा बनवून देण्यासाठी संबंधित नागरिकाकडे आठ हजार रुपयांची लाच मागितली होती. त्यानुसार, तक्रारदाराकडून लिपिक बिडकर यांच्याकडून लाचेची रक्कम आठ हजार रुपये स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. दरम्यान, दोन्ही प्रकरणात तपास केला जात आहे.

### महाराष्ट्राची हास्यजत्राध्ये प्रसाद ओकच्या नव्या लूकची चर्चा

**मुंबई । प्रतिनिधी :** मराठी मनोरंजन विश्वात अत्यंत लोकप्रिय असलेल्या 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमाच्या सध्याच्या भागांमध्ये प्रेक्षकांना प्रसाद ओक एका वेगळ्याच लूकमध्ये पाहायला मिळतोय. कधी डोक्यावर टोपी, तर कधी रंगीत रुमाल बांधून तो प्रहसनांचा आस्वाद घेताना दिसतो आणि कलाकारांना मनापासून दाद देतो. पण, प्रसादच्या या बदललेल्या स्टाइलमागचं कारण काय? हा प्रश्न चाहत्यांना पडला होता. आता या प्रश्नाचं उत्तर मिळालं असून ही केवळ फॅशन नसून, एका मोठ्या भूमिकेची तयारी आहे. अभिनेता प्रसाद ओक सध्या ' खंजिरीचे बोल ' या आगामी सिनेमाच्या चित्रीकरणात व्यस्त आहे. या सिनेमात प्रसाद राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भूमिका साकारत आहे.या भूमिकेशी पूर्णतः एकरूप होण्यासाठी प्रसादनं टक्कल केलं आहे त्याचा हा लूक लपवण्यासाठीच तो कार्यक्रमात टोपी किंवा रुमालाचा वापर करत असल्याचं दिसतंय. त्याच्या या समर्पणातून त्याची भूमिकेप्रति असलेली निष्ठा ठळकपणे दिसून येते. 'खंजिरीचे बोल' सिनेमाचा मुहूर्त अलीकडेच सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते झाला. या सिनेमाचं दिग्दर्शन अनंत महादेवन करत आहेत. 'खंजिरीचे बोल' सिनेमा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित असून, तुकडोजी महाराजांची ग्रामगीता, समाज प्रबोधन आणि राष्ट्रभक्तीचा संदेश या सिनेमातून नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.या सिनेमासाठी संशोधन आणि लेखन श्रीकांत बोजेवार यांनी केलं असून संगीत कौशल इनामदार यांनी दिलं आहे.

# नाशिकच्या नामांकित कंपनीमध्ये महिलांवर लैंगिक अत्याचार

## सहा आरोपींना अटक, महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक जारी

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक । प्रतिनिधी :** शहरातील एका नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीत काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांवरील अत्याचाराचा गंभीर प्रकार समोर आल्यानं खळबळ उडाली आहे. महिलांवर कंपनीतील काही पुरुष कर्मचाऱ्यांकडून लैंगिक अत्याचार, मानसिक छळ तसंच धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करण्यात आला आहेत.



या प्रकरणी एकूण ९ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या घटनेची व्याप्ती, गांभिर्य आणि संवेदनशीलता लक्षात घेता पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक स्थापन करण्यात आल्याची माहिती, सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांनी दिली.

नाशिक शहरामध्ये भोंदूबाबा अशोक खरात, रवींद्र एरंडेचं महिला अत्याचाराचं प्रकरण ताजं असताना, या नव्या प्रकरणामुळं शहरातील महिलांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. खासगी कंपन्यांनी आपल्या कार्यस्थळी महिलांच्या सुरक्षिततेसाठी कडक उपाययोजना राबवण्याची गरज बोलून दाखवली जात आहे.

### महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक जारी

अशा प्रकारच्या घटना घडू नये यासाठी सर्व खासगी आस्थापनांनी आपल्या कार्यस्थळी महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात आवश्यक ती खबरदारी व प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. कोणत्याही महिलेला विनयभंग किंवा अत्याचारासंबंधी तक्रार असल्यास सीपी व्हाट्सअप क्रमांक ९९२३३२३३११ वर संदेश पाठवू शकतात किंवा नियंत्रण कक्ष क्रमांक ११२ वर संपर्क साधून आपली तक्रार नोंदवू शकतात. तक्रारदार महिला आणि संस्था किंवा माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांनी दिली आहे.

# एचपीव्ही लस सुरक्षित

## अफवांना बळी पडू नका-डॉ. अमोल गीते यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणारा गर्भाशय मुखाचा कॅन्सर हा गंभीर आणि चिंताजनक आजार ठरत असून, त्यापासून बचावासाठी एचपीव्ही लसीकरण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांनी स्पष्ट केले आहे. लसीबाबत समाजात पसरत असलेल्या अफवा व गैरसमजांना बळी न पडता नागरिकांनी जागरूकता ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.




आ रो ग्य तज्ज्ञांच्या मते, ह्युमन पॅपिलोमा व्हायरस हा गर्भाशय मुखाच्या कॅन्सरचा मुख्य कारणीभूत घटक आहे. या विषाणूपासून संरक्षण मिळवण्यासाठी एचपीव्ही लस प्रभावी उपाय ठरते. विशेषतः ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींसाठी ही लस अधिक उपयुक्त असून, योग्य वयात घेतल्यास भविष्यात कॅन्सरचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो.

सध्या सोशल मीडियावर लसीबाबत चुकीची माहिती पसरवली जात आहे. काही ठिकाणी लसीमुळे गंभीर दुष्परिणाम होतात, अशी भीती निर्माण केली जात आहे; मात्र ही माहिती पूर्णपणे चुकीची आहे. एचपीव्ही लस आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त असून अनेक देशांमध्ये ती सुरक्षितपणे वापरली जात आहे, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते सांगितले.

एचपीव्ही लस का महत्त्वाची : गर्भाशय मुखाच्या कॅन्सरपासून प्रभावी संरक्षण, एचपीव्ही संसर्गाचा धोका कमी, योग्य वयात घेतल्यास दीर्घकालीन लाभ, सुरक्षित आणि परिणामकारक लसीकरण,

गैरसमज दूर करा : लसीमुळे गंभीर दुष्परिणाम होत नाहीत, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरण पूर्णपणे सुरक्षित, अफवांपेक्षा डॉक्टरांचा सल्ला अधिक विश्वासार्ह.

मुलींच्या आरोग्यासाठी वेळेवर एचपीव्ही लसीकरण करून त्यांना गंभीर आजारांपासून सुरक्षित ठेवावे. महिलांमध्ये गर्भाशय मुखाच्या कॅन्सरचे वाढते प्रमाण लक्षात घेता, एचपीव्ही लस घेणे ही काळाची गरज आहे. ही लस सुरक्षित असून कॅन्सरचा धोका कमी करण्यास मदत करते, असेही त्यांनी नमूद केले.

### अशोक खरातला न्यायालयीन कोठडी

**नाशिक । प्रतिनिधी :** नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आज नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीत न्यायालयाने अशोक खरातला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. तसेच आरोपी अशोक खरातला उद्या पुन्हा न्यायालयात हजर करा, असे आदेशही न्यायाधीशांनी दिले. आरोपी अशोक खरातला दुसऱ्या गुन्हात न्यायालयीन कोठडी मिळाल्याने आरोपीला सेंट्रल जेलमध्ये दाखल केले जाणार आहे. तिथून पुन्हा आरोपीचा एसआयटी ताबा घेणार अशी माहिती समोर येत आहे. गेल्या सुनावणीत न्यायालयाने अशोक खरातला ८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली होती. ही पोलीस कोठडीची मुदत संपल्याने अशोक खरातला आज न्यायालयात हजर केले. मागील सुनावणी प्रमाणेच सुरक्षेच्या कारणास्तव अशोक खरातला व्हिडीओ कॉनफरन्सद्वारे नाशिक सत्र न्यायालयात हजर करण्यात आले.

# उन्हाळी हंगाम २०२६ साठी 'ई-पीक पाहणी' सुरू; २४ मेपर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी डिजिटल क्रॉप सर्वे प्रकल्पांतर्गत उन्हाळी हंगाम २०२६ साठी 'ई-पीक पाहणी' मोहिमेची सुरुवात आजपासून करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांची नोंदणी स्वतः अॅन्ड्रॉईड मोबाईलद्वारे करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या मोहिमेची अंतिम मुदत २४ मे २०२६ पर्यंत निश्चित करण्यात आली आहे.




शेतकऱ्यांनी आपल्या ७/१२ उताऱ्यावर पीक पेरा नोंदविण्यासाठी 'ई-पीक पाहणी व्हर्जन ४.०.५' या मोबाईल अॅपचा वापर करणे आवश्यक आहे. हे अॅप मोबाईलमध्ये इन्स्टॉल करून शेतात जाऊन पिकांची माहिती नोंदवून अपलोड करावी लागणार आहे. अॅप सुरळीत चालण्यासाठी गुगल क्रोम अपडेट असणे आवश्यक असल्याचेही सांगण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांकडे अॅन्ड्रॉईड मोबाईल उपलब्ध नाही किंवा अॅप वापरणे शक्य नाही, त्यांनी संबंधित गावाचे तलाठी, कोतवाल किंवा नियुक्त सहाय्यक यांची मदत घ्यावी. तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर मार्फतही ही सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रशासनाच्या माहितीनुसार, डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत १०० टक्के ई-पीक पाहणी नोंद करणे बंधनकारक आहे. उन्हाळी हंगामात शेतात उभ्या असलेल्या पिकांसह कायम पड किंवा चालू पड जमिनींचीही नोंद करणे आवश्यक आहे. शेतकरी स्तरावर नोंदणी न झाल्यास, संबंधित जमिनींची नोंद सहाय्यक स्तरावरून पूर्ण करण्यात येणार आहे.

महत्त्वाचे म्हणजे, वेळेत ई-पीक पाहणी न केल्यास ७/१२ उताऱ्यावर पीक पेरा नोंद कोरी राहू शकते. यामुळे पीक विमा, शासकीय अनुदाने व इतर लाभ मिळविण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसान भरपाईसाठी अचूक पीक नोंद आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर, सर्व शेतकरी बांधवांनी अंतिम मुदतीपूर्वी आपल्या पिकांची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी केले आहे.

# व्यक्तिमत्त्व अधिकारांच्या रक्षणाची मागणी करत अभिनेता कार्तिक आर्यनची हायकोर्टात धाव

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** अभिनेता कार्तिक आर्यननंही आपल्या व्यक्तिमत्त्व अधिकारांच्या रक्षणासाठी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतलीय. ऑनलाइन माध्यमांवर आपले नाव, फोटो, आवाज यांचा वापर हा आपल्या व्यक्तिमत्त्व हक्कांचे उल्लघन आहे. या कथित अनधिकृत व्यावसायिक वापरापासून आपल्याला संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी कार्तिकनं या याचिकेतून केलीय.

काय आहे याचिका? - कार्तिकनं दाखल केलेल्या या याचिकेनुसार, त्याचं नाव आणि चेहरा यांचा वापर विविध वस्तूंच्या जाहिराती, प्रमोशन आणि इतर काही ठिकाणी कोणत्याही पूर्व परवानगीशिवाय केला जातोय. या प्रकारांमुळे आपली लोकप्रियता आणि खासगी जीवनमानावर परिणाम होऊन आपल्या व्यक्तिमत्त्व अधिकारांचं उल्लंघन होत असल्याचा दावा कार्तिकनं आपल्या याचिकेतून केलाय. काहींनी तर निव्वळ व्यावसायिक फायद्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डीपफेकचा वापर करून आपली छायाचित्रे, चित्रफिती, आवाज तयार करून त्याचा व्यावसायिक वापर सुरू केल्याचा आरोपही कार्तिकच्या वतीनं या याचिकेतून करण्यात आलाय. त्यामुळे अशा सर्व गैरप्रकारांवर तातडीनं कारवाई करत आपल्या पूर्व परवानगीशिवाय आपल्या प्रतिमेशी संबंधित कोणत्याही वैयक्तिक वैशिष्ट्यांचा वापर करण्यापासून या वापरकर्त्यांना रोखण्यासाठी कायम स्वरूपी मनाई आदेश देण्याची मागणी या याचिकेतून केलीय.

व्यक्तिमत्त्व प्रतिमेचा गैरवापर होत असल्याचा कार्तिककडून दावा - या याचिकेत कार्तिकनं अनेक भारतीय आणि आंतरराष्ट्रीय ई-कॉमर्स कंपन्या तसेच सोशल मीडियातील व्यासपीठांविरुद्ध आपली छायाचित्रं आणि चित्रफितींचा गैरवापर केल्याचा आरोप ठेवलाय. काही अज्ञात व्यक्तींविरुद्ध बौद्धिक संपदा हक्क कायद्यांतर्गत दावा दाखल केलाय. त्यामुळे या सर्व ऑनलाइन व्यासपीठांना संबंधित ऑनलाइन पोर्टलवरील मजकूर तातडीनं हटवण्याचे आदेश देत संबंधित सरकारी अधिकाऱ्यांना असा मजकूर ऑनलाइन काढून टाकण्याची कारवाई करण्याची मागणी करण्यात आलीय. तसेच त्यामागे असलेल्या व्यक्तींची ओळख उघड करण्याची मागणीही कार्तिकनं या याचिकेद्वारे हायकोर्टाकडे केलीय. गेल्या काही काळापासून एकापाठोपाठ एक अनेक सेलिब्रिटींनी वैयक्तिक हक्कांच्या रक्षणासाठी अथवा प्रसिद्धी हक्कांच्या मुद्द्यावर न्यायालयांचे दरवाजे ठोठावले आहेत. यात अमिताभ बच्चन, अभिषेक बच्चन, जया बच्चन, ऐश्वर्या राय, ऋतिक रोशन, अनिल कपूर, जॅकी श्रॉफ, आशा भोसले, सुनील शेट्टी आणि इतरांची बरीच मोठी यादी तयार होईल.

# प्रगत इंटरकनेक्टिव्हिटी आणि बँडविड्थ वाढविण्याची क्षमता शासनासाठी उपयुक्त ठरणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ


**मुंबई । प्रतिनिधी :** विविध शासकीय योजनांच्या ऑनलाईन अंमलबजावणीदरम्यान बँडविड्थची कमतरता ही मोठी अडचण ठरत होती. विशेषतः शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू केल्यावर अचानक वाढणाऱ्या इंटरनेट ट्रॅफिकमुळे प्रणाली कोलमडण्याची समस्या निर्माण होण्याची शक्यता असायची. अशा परिस्थितीत डेटा सेंटरमधील प्रगत इंटरकनेक्टिव्हिटी आणि तत्काळ बँडविड्थ वाढविण्याची क्षमता शासनासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस हस्ते वर्षा निवासस्थानी इक्विनिक्स ( ) कंपनीच्या एमबी ३ डेटा सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, मुख्य आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे तसेच एपीएसी ( ) चे अध्यक्ष

### इक्विनिक्स एमबी ३ डेटा सेंटरचे उद्घाटन

सायरस अडग्रा, इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज पॉल, व्ही.पी. ग्रोथ अँड इमर्जिंग मार्केटचे मॅक्स पॅरी, आयबीएक्सचे वरिष्ठ संचालक गणेश पवार, पब्लिक पॉलिसी अँड गव्हर्नन्सच्या संचालक एलिजाबेथ हर्नांडेझ उपस्थित होते.

इक्विनिक्स ही जगातील सर्वात मोठी डेटा सेंटर आणि इंटरकनेक्शन सेवा देणारी कंपनी असून, ३६ देशांतील ७७ महानगरांमध्ये २८० डेटा सेंटर्सचे जाळे कंपनीकडे आहे. भारतातील इक्विनिक्सचे पूर्णतः स्वतःच्या मालकीचे आणि नव्याने उभारलेले एमबी ३ हे पहिले डेटा सेंटर आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३.७ एकर जागेवर उभारणी करण्यात




आली असून, एकूण गुंतवणूक सुमारे ७५० दशलक्ष अमेरिकन डॉलर (सुमारे ६,००० कोटी रुपये) इतकी आहे. पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर येथे ४,२०० हून अधिक कॅबिनेट्सची क्षमता उपलब्ध होणार आहे. एमबी ३ डेटा सेंटर अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असून, कृत्रिम बुद्धिमत्ता ( ) आधारित सेवांसाठी सक्षम आहे. तसेच, हायब्रिड मल्टी-क्लाउड इंटरकनेक्शन सुविधेद्वारे जगभरातील इक्विनिक्सच्या डेटा सेंटर्सशी तसेच ११ हजाराहून अधिक ग्राहकांशी जोडणी शक्य होणार आहे.

ऊर्जा शाश्वततेच्या दृष्टीने यवतमाळ येथे उभारण्यात आलेल्या २६.६ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पातून या डेटा सेंटरसाठी आवश्यक ऊर्जेचा मोठा भाग उपलब्ध करून देण्यात येत आहे. सध्या मुंबईतील इक्विनिक्स डेटा सेंटर्समध्ये वापरल्या जाणाऱ्या उर्जेपैकी सुमारे ६० टक्के ऊर्जा या सौर प्रकल्पातून मिळते.

# माणुसकीचा अंत! ज्यांच्या हाती भविष्य घडवायची जबाबदारी, त्याच नराधम शिक्षकाने ओरबाडले चिमुरड्यांचे बालपण

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा। प्रतिनिधी :** आई-वडील आपल्या काळजाचा तुकडा असलेल्या लेकीला विश्वासाने शाळेत पाठवतात, जिथे गुरु तिचे रक्षण करेल आणि तिला जगायला शिकवेल. मात्र, मेहकर तालुक्यातील एका जिल्हा परिषद शाळेत या विश्वासाचा अक्षरशः तुकडा-तुकडा झाला आहे. विद्येच्या मंदिरात एका ५७ वर्षीय नराधम शिक्षकाने आपल्या नातीच्या वयाच्या तीन चिमुरड्या मुलींचे आयुष्य उद्‌ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला.

या घटनेने संपूर्ण बुलढाणा जिल्हा हादरला असून माणुसकी नेमकी कुठे हरवली आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे. विद्येच्या मंदिरात वासनेचा नंगानाच ज्या हातांनी या चिमुरड्यांना पाटीवर अ अक्षराचे धडे गिरवायला शिकवायचे, त्याच हातांनी या कोवळ्या कळ्यांना ओरबाडण्याचे पाप केले. तिसरीत शिकणाऱ्या त्या तीन चिमुरड्या मुली, ज्यांना अद्याप जगाचे व्यवहारही नीट कळत नाहीत, त्यांच्यावर महादेव आत्माराम मानतोडे या शिक्षकाने ७ एप्रिल रोजी लैंगिक अत्याचार केला.



आरोपी

शाळेच्या चार भिंतींच्या आत घडलेला हा प्रकार म्हणजे विश्वासाची हत्याच आहे.

**जीवे मारण्याची धमकी आणि भयावह वास्तव**

पाशवी अत्याचार करून हे नराधम शिक्षक थांबले नाहीत, तर त्यांनी या निष्पाप मुलींना कोणालाही काही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. भयाने थरथरणारी ती कोवळी मने आणि त्यांच्या डोळ्यांतील अश्रू पाहून कोणाचेही काळीज पिळवटून जाईल. ज्या शिक्षकाला समाजात देवापेक्षा मोठे स्थान दिले जाते, त्यानेच भक्षक बनून या चिमुरड्यांचे बालपण करपवून टाकले.



**पालकांचा आक्रोश आणि पोलिसांची कारवाई**

घटनेची माहिती मिळताच पालकांच्या पायाखालची जमीन सरकली. डोणगाव पोलीस स्टेशनमध्ये या नराधमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो अंतर्गत कठोर कलमे लावून आरोपीला बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. मात्र, पोलिसांनी केलेली ही कारवाई त्या मुलींच्या मनावर उमटलेले जखमांचे व्रण पुसून टाकू शकेल का? हाच मोठा प्रश्न आहे.

''शिक्षक म्हणजे ज्ञानाचा सागर आणि संरक्षणाची भिंत मानला जातो. पण जेव्हा तोच भिंत ढासळते आणि कोवळ्या कळ्यांना चिरडते, तेव्हा समाज म्हणून आपण नक्की कुठे चाललो आहोत, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. अशा विकृत मानसिकतेच्या माणसाला कठोरात कठोर शिक्षा होऊन समाजासमोर एक उदाहरण उभे राहणे गरजेचे आहे.''

## वृत्तविशेष...

### जागतिक आरोग्य दिनानिमित्त जिल्हा रुग्णालयात विविध उपक्रमांचे आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा। प्रतिनिधी :** जिल्हा रुग्णालय व परिचारिका प्रशिक्षण केंद्र, बुलढाणा येथे विविध उपक्रमांचे आयोजन करून जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षीचा घोषवाक्य ''एकत्रित प्रयत्न आरोग्यासाठी, विज्ञानाची साथ भविष्यासाठी'' यावर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी प्राचार्य उज्वला खेडेकर, मेट्रन आरती कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान जागतिक आरोग्य दिनाचे महत्त्व अधोरेखित करत आरोग्य विषयक विविध शासकीय योजनांचा आढावा घेण्यात आला. प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर विशेष भर देण्यात आला.

मार्गदर्शनपर भाषणात जोशी सर यांनी निरोगी समाज निर्मितीसाठी सर्व घटकांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले. आधुनिक विज्ञानाच्या साहाय्याने आरोग्य सेवा अधिक प्रभावी करता येतात, तसेच स्वच्छता, संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

यावेळी ''माझे गाव, आरोग्य संपन्न गाव'' मोहिमेअंतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. ग्रामीण भागात जनजागृतीसाठी सोशल मीडिया, स्थानिक माध्यमे, वृत्तपत्रे व यशोगाथांचा प्रभावी वापर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमात आरोग्य पर्यवेक्षक अनिल लोखंडे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले, तसेच परिचारिका प्रशिक्षणार्थींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बुलढाण्यात 'अमृतपेठ थेट बाजारपेठ २०२६' महोत्सव; उद्योजकांसाठी सुवर्णसंधी

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा। प्रतिनिधी :** महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने 'अमृतपेठ थेट बाजारपेठ २०२६' हा लघुउद्योग, व्यवसाय व उद्योजकता महोत्सव ११ ते १३ दरम्यान बुलढाणा येथे आयोजित करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे स्थानिक लघुउद्योजक, महिला बचतगट, स्टार्टअप्स आणि नवउद्योजकांना थेट बाजारपेठ, प्रशिक्षण व मार्गदर्शनाची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

या महोत्सवाचा मुख्य उद्देश ग्रामीण व शहरी भागातील उद्योजकांना सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा असून, उत्पादनांची थेट विक्री, ग्राहकांशी संवाद आणि नवीन व्यावसायिक संधी निर्माण करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. तसेच, उद्योजकांना व्यवसायवाढीसाठी आवश्यक मार्गदर्शन, कौशल्य प्रशिक्षण आणि नेटवर्किंगची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे.

'अमृतपेठ' हे केवळ प्रदर्शन नसून, तरुणांना स्वावलंबन आणि आत्मनिर्भरतेकडे नेणारे प्रभावी माध्यम ठरत आहे. या माध्यमातून अनेक युवक-युवतींना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची प्रेरणा मिळत असून, स्थानिक उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळण्यास मदत होत आहे. दोन दिवसीय या महोत्सवात हस्तकला, घरगुती उद्योग, कृषी आधारित उत्पादने, फूड प्रोडक्ट्स तसेच सेवा क्षेत्रातील विविध स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांना दर्जेदार स्थानिक उत्पादनांचा अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे. महिला व पुरुष, युवक-युवती तसेच उद्योजकांनी आपल्या उत्पादनांसाठी स्टॉल बुक करण्यासाठी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. इच्छुकांनी जिल्हा व्यवस्थापक, अमृत जिग्रेश कमानी यांच्याशी ९११२२२७६३७ / ८३०८९९८९२२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

'अमृतपेठ २०२६' ही स्वदेशी उत्पादनांची खरी बाजारपेठ ठरणार असून, स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनी कुटुंबासह महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. हा उपक्रम जिल्ह्याच्या आर्थिक व सामाजिक विकासाला चालना देत रोजगारनिर्मिती व उद्योजकतेला नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

### शक्तीपीठ महामार्गाच्या नव्या संरचनेत सिंधुदुर्गमधील 10 गावांचा समावेश

**बुलढाणा। प्रतिनिधी :** प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाला काही भागांतून होणारा शेतकऱ्यांचा तीव्र विरोध लक्षात घेता, राज्य सरकारने या प्रकल्पाच्या आराखड्यात मोठे बदल केले आहेत. नव्या नियोजनानुसार महामार्गाचे सरेखन बदलण्यात आले असून, यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी आणि दोडामार्ग या दोन सीमावर्ती तालुक्यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. या दोन्ही तालुक्यांतील प्रत्येकी पाच अशा एकूण १० गावांचा समावेश या महामार्गात करण्यात आला आहे.

## करवंड येथे 'ऐतिहासिक करवंड महोत्सव २०२६'चे भव्य आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा। प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज आणि गुणवंताबाई इंगळे यांच्या ऐतिहासिक विवाह स्मृतींना यंदा तब्बल ३७० वर्षे पूर्ण होत असून, या ऐतिहासिक घटनेचे औचित्य साधत बुलढाणा जिल्ह्यातील करवंड येथे बुधवार, १५ एप्रिल २०२६ रोजी 'ऐतिहासिक करवंड महोत्सव २०२६'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि करवंड महोत्सव कृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. महोत्सवाची सुरुवात सकाळी ८ वाजता भव्य ऐतिहासिक शोभायात्रेने होणार असून, यात शिवराय आणि गुणवंताबाईंच्या वेशभूषेत कलाकार, लेझिम पथके, बँड, अश्वदल आणि पालखी यांचा आकर्षक सहभाग असणार आहे. यानंतर सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत उद्घाटन सोहळा पार पडणार असून, केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होईल.

दुपारी १ ते २ या वेळेत पोवाडा व विविध लोककला सादरीकरण होणार आहे. त्यानंतर सुप्रसिद्ध शाहिर रामानंद उगले यांच्या शौर्यगाथांवर आधारित विशेष कार्यक्रम होईल. दुपारी ३ ते ५ या वेळेत नामवंत इतिहासकार रामचंद्र पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. रात्री ८ ते १० या वेळेत कोल्हापूर व सातारा येथील ५० पेक्षा अधिक कलाकारांच्या सहभागातून 'तीर्थ शिवराय' हे भव्य महानाट्य सादर करण्यात येणार आहे. यासोबतच युद्धकला प्रात्यक्षिके तसेच कथ्थक आणि भरतनाट्यम नृत्य सादरीकरण देखील होईल. महोत्सवाचा समारोप रात्री १० वाजता भव्य ऐतिहासिक बारूद आतषबाजीने होणार आहे.

या महोत्सवात प्राचीन नाणे प्रदर्शन, पुस्तक प्रदर्शन आणि महिला बचत गटांचे विविध स्टॉल्स हे देखील विशेष आकर्षण ठरणार आहेत. यावेळी शिवरायांच्या सर्व महाराणींच्या घराण्यातील वंशजांची उपस्थिती लाभणार असून, आमदार श्वेताताई महाले पाटील आणि करवंड महोत्सव कृती समितीच्या वतीने नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना २०२६ सुशिक्षित बेरोजगारांसाठी सुवर्णसंधी

### ९ हजार रुपये विद्यावेतनासह नामांकित कंपन्यांत कामाची संधी

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा। प्रतिनिधी :** केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना २०२६' च्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात आली आहे. देशातील सुशिक्षित बेरोजगार




तरुणांना कॉर्पोरेट जगात कामाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा आणि त्यांचे कौशल्य विकसित व्हावे, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत आता १२ एप्रिल २०२६ पासून नवीन नियम व अधिक सवलती लागू होणार आहेत.

योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आणि बदल: निवड झालेल्या उमेदवारांना आता दरमहा ९ हजार रुपये विद्यावेतन दिले जाणार आहे. यातील काही हिस्सा कंपन्यांमार्फत, तर उर्वरित रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) उमेदवाराच्या खात्यात जमा होईल. वयोमर्यादेत शिथिलता देण्यात आली असून, आता १८ ते २५ वर्षे वयोगटातील युवक या योजनेसाठी पात्र आहेत. १० वी, १२ वी, आयटीआय, डिप्लोमा, पदवीधरांसह आता पदव्युत्तर (Post Graduate) आणि चइ- झालेले विद्यार्थीही अर्ज करू शकणार आहेत. इंटर्नशिपचा कालावधी ६ ते ९ महिने इतका असेल. तसेच, रुजू झाल्यानंतर आकस्मिक खर्चासाठी उमेदवाराला ६,००० रुपये एकरकमी सानुग्रह अनुदान दिले जाईल.

नोंदणी प्रक्रिया आणि अटी: इच्छुक उमेदवारांनी सरकारच्या अधिकृत पोर्टल pminternship.mca.gov.in वर जाऊन आपली नोंदणी पूर्ण करावी. एका उमेदवाराला जास्तीत जास्त ३ वेगवेगळ्या इंटर्नशिपसाठी अर्ज करण्याची मुभा आहे. उमेदवार सध्या पूर्णवेळ नोकरी करत नसावा, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १२ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे, कुटुंबातील कोणतीही व्यक्ती सरकारी नोकरीत नसावी.

या योजनेद्वारे सेमीकंडक्टर, रिन्यूएबल एनर्जी आणि आयटी यांसारख्या २० पेक्षा जास्त क्षेत्रांतील ३०० हून अधिक आघाडीच्या कंपन्यांमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त तरुण-तरुणींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त गणेश बिटोडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा या कार्यालयाच्या ०७२६२-२४२३४२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

## जिल्ह्यात ८ ते १४ एप्रिल दरम्यान सामाजिक समता सप्ताह; विविध लोककल्याणकारी कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा। प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात दि. ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. जिल्ह्यामध्ये या सप्ताहाचे नियोजन करण्यात आले असून, समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी पत्रकार परिषदेमध्ये सांगितले.

या सप्ताहाची सुरुवात आज करण्यात आली असून सामाजिक न्याय विभागाच्या योजनाची माहिती पत्रकार परिषदेच्या माध्यमातून देण्यात आली. ९ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगे महाराज यांच्या विचारांवर जिल्ह्यातील शासकीय निवासी शाळा व वसतिगृहामध्ये निबंध, वक्तृत्व आणि लघुनाट्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल. १० एप्रिल रोजी समतादूतांच्या माध्यमातून पथनाट्ये सादर करून सामाजिक न्याय विभागाच्या मार्जिन मनी योजनेसह इतर महत्त्वाच्या योजनांचे प्रबोधन केले जाईल. ११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या सामाजिक कार्यावर आधारित विशेष कार्यक्रम तसेच संविधान जागर अंतर्गत भारतीय संविधानाची माहिती व महिला मेळाव्याचे आयोजन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलाविषयक कार्य अधोरेखित केले जाईल.



१३ एप्रिल रोजी शाळा, महाविद्यालय, आश्रमशाळेत रक्तदान शिबीर, स्वच्छता अभियान व जात पडताळणी प्रमाणपत्र प्रदान केले जाईल. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल, ज्यामध्ये मान्यवरांची व्याख्याने व चर्चासत्रे होतील. या सर्व उपक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समाज कल्याण विभागामार्फत करण्यात आले आहे.

## आंबा बागेच्या नुकसानग्रस्त शेतकऱ्याला न्याय मिळवून देणार – रामकृष्ण वेताळ

**दैनिक आपला विदर्भ**

■ **अशोक मुंढे**

**महारचिकना :** लोणार तालुक्यातील वडगाव तेजन येथील शेतकरी सतीश तेजनकर यांच्या आंबा बागेला लागलेल्या आगीत मोठे नुकसान झाले असून या प्रकरणाची आपला विदर्भ लाईव्हमध्ये बातमी प्रसिद्ध होताच प्रशासनाने तात्काळ दखल घेतली आहे. दिनांक ३० मार्च २०२६ रोजी लागलेल्या आगीत सुमारे एक हेक्टर क्षेत्रातील १५०० पैकी तब्बल १४०० आंब्याची झाडे पूर्णतः जळून खाक झाली.



बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर तलाठी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक तसेच पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा करून अहवाल सादर केला. दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकरी सतीश तेजनकर यांनी तहसीलदारांसह भारतीय जनता पार्टी किसान मोर्चाकडेही न्यायासाठी निवेदन दिले होते. यानंतर किसान मोर्चाचे बुलढाणा जिल्हा महामंत्री मारोतराव सुरोशे यांनीही तहसीलदारांकडे निवेदन देत शेतकऱ्याला मदत करण्याची मागणी केली. आज (दि. ८ एप्रिल) भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांनी पदाधिकाऱ्यांसह शेतकऱ्याची भेट घेऊन संपूर्ण परिस्थितीची पाहणी केली. यावेळी जिल्हाध्यक्ष चक्रधर लांडे, महामंत्री मारोतराव सुरोशे, प्रभाकर कायंदे, रामेश्वर जाधव, सखाराम कुलकर्णी, गजानन वरकड यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांनी, ''आगीत मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या शेतकरी सतीश तेजनकर यांची व्यथा शासन दरबारी मांडून त्यांना आर्थिक मदत व न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू,'' असे आश्वासन दिले. तसेच प्रदेश सरचिटणीस रंगनाथ सोळंके, प्रदेश संयोजक राहुल भोसले व सहसंयोजक सुधाकर गिते यांचीही उपस्थिती होती.